# नाशिक महानगरपालिका,नाशिक
## जाहिरात व परवाने विभाग
राजीव गांधी भवन (मुख्यालय), शरणपुररोडनाशिक -४२२ ००२

---

**सार्वजनिक सण-उत्सवांकरिता तात्पुरत्या स्वरूपातील मंडप, स्टेज व कमानी उभारण्यासाठी ऑनलाईन परवानगी घेण्याबाबत जाहिर सुचना**

---

नाशिक महानगरपालिका क्षेत्रात गणेशोत्सव, नवरात्रोत्सव, शिवजयंती, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती, रमजान ईद, मोहरम, नाताळ तसेच इतर सार्वजनिक सण-उत्सवांच्या निमित्ताने विविध सार्वजनिक मंडळे, संस्था व संघटनांकडून तात्पुरत्या स्वरूपातील मंडप, स्टेज, कमानी इत्यादी उभारण्यात येतात.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ मधील कलम २३४ तसेच मा. उच्च न्यायालयाचे निर्देश, महाराष्ट्र शासनाच्या मार्गदर्शक सूचना आणि नाशिक महानगरपालिकेने दिनांक ०७/०७/२०२० रोजी निर्गमित केलेल्या सुधारित परिपत्रकानुसार, सार्वजनिक रस्ता अथवा सार्वजनिक ठिकाणी तात्पुरत्या स्वरूपातील मंडप, स्टेज व कमानी उभारण्यासाठी संबंधित पोलीस विभागाच्या ना-हरकत / संमतीच्या अधीन राहून केवळ ऑनलाईन परवानगी देण्यात येते. त्याअनुषंगाने, सर्व सार्वजनिक मंडळे, संस्था व आयोजकांनी संबंधित सण-उत्सवाच्या किमान ३० दिवसांपूर्वी नाशिक महानगरपालिकेच्या **http://nmcfest.nmc.gov.in** या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज सादर करावा. सण किंवा कार्यक्रमाच्या दिनांकाच्या ७ (सात) दिवसांपेक्षा कमी कालावधीत प्राप्त झालेल्या अर्जांचा विचार करण्यात येणार नाही.

परवानगी प्राप्त झाल्यानंतरच मंडप, स्टेज अथवा कमान उभारावी. तसेच महानगरपालिकेने दिलेल्या परवानगीची प्रत किंवा परवानगी क्रमांक मंडप, स्टेज अथवा कमानीच्या दर्शनी भागावर स्पष्टपणे प्रदर्शित करणे बंधनकारक राहील. विना परवानगी अथवा परवानगीच्या अटींचे उल्लंघन करून उभारण्यात आलेले मंडप, स्टेज किंवा कमानी अनधिकृत समजून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ तसेच लागू असलेल्या नियमांनुसार ते हटविण्याची व आवश्यक ती कायदेशीर कारवाई करण्याची कार्यवाही नाशिक महानगरपालिकेमार्फत करण्यात येईल. त्यासंबंधीचा सर्व खर्च व जबाबदारी संबंधित आयोजकांची राहील.

त्यामुळे, आगामी गणेशोत्सव, नवरात्रोत्सव तसेच इतर सर्व सार्वजनिक सण-उत्सवांकरिता तात्पुरत्या स्वरूपातील मंडप, स्टेज व कमानी उभारण्यापूर्वी सर्व संबंधितांनी विहित मुदतीत ऑनलाईन परवानगी घेऊनच उभारणी करावी, असे आवाहन नाशिक महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहे.

XXX
आयुक्त
नाशिक महानगरपालिका, नाशिक